# संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ५०९/२०२३ मधील नि. ४ खालील आदेश.

( यासीन हमीदखान पठाण वि. महाराष्ट्र शासन )

अर्जदार यांनी प्रस्तूतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५१ प्रमाणे गु.र.नं. ७९/२०२३ मध्ये चोरीला गेलेल्या मुद्देमालपैकी पोलीस स्टेशनचे ताब्यात असलेल्या मुद्देमालाचा तपशिल खालीलप्रमाणे–

१) र. रु. १०,०००/– किंमतीचे दोन गोल टेबल लाल रंगाचे सनमाईक असलेले

२) र. रु. ५०००/– किंमतीचे एक चौकोनी टेबल उडनरंगाचा

३) र. रु. १०,०००/– किंमतीचे दोन बजाज कंपनीचे स्टॅण्डींग फॅन निळे पाते असलेले

४) एक कुलर क्लासीक कंपनीचा सिल्व्हर रंगाचा

५) र. रु. १२,००/– किंमतीचे चार जार निळे रंगाचे

६) र. रु. ३६००/– किंमतीचे नऊ काळ्या रंगाच्या फायबरच्या खुर्च्या

७) र. रु. ४८००/– किंमतीचे बारा क्रिम रंगाच्या फायबरच्या खुर्च्या

वरील मुद्देमाल परत मिळावे यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले आहे की, गु.र.नं. ७९/२०२३ मध्ये वरील मुद्देमाल जप्त केलेला आहे. अर्जदार हे सदर मुद्देमालाचे मालक आहेत. त्यामुळे अर्जदाराने वरील मुद्देमाल परत मिळावा अशी विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी अर्जातील त्यांचे कथनांस अनुसरुन निशाणी ५ वर स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तर निशाणी ६ सोबत अनुक्रमांक १ ते ३ वर समर्थ फर्नीचर मॉल येथुन जार, खुर्च्या, गोल टेबल व चौकोणी टेबल खरे दोन गोल टेबल लाल दीची पावती, बजाज कंपनीचे दोन पंखे व त्याची ओवी इलेक्ट्रीक ॲन्ड इलेक्ट्रीक वाठार स्टेशन यांची मुळ पावती व क्लासीक कुलरची मुळ पावती दाखल केलेली आहे.

४. विद्वान सरकारी वकिल यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला

आहे. त्यांचे म्हणणे असे की, जप्त केलेला मुद्देमाल हा गुन्ह्याकामी वापरला असल्याने व तो पुराव्यावेळी ओळखकामी महत्वाचा पुरावा आहे. सदर मुद्देमाल परत केल्यास त्याच्या मुळ स्वरुपात बदल होण्याची व विक्री करण्याची शक्यता आहे. करीता, सरकारी विधिज्ञांनी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

५. अर्जदारातर्फे दाखल कागदपत्रावरुन व सरकारी वकीलांनी दाखल केलेल्या म्हणण्यावरुन गु.र.नं. ७९/२०२३ मध्ये अर्जदाराने मागणी केलेला मुद्देमाल जप्त केल्याचे दिसुन येते. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणात सदर मुद्देमालाच्या मुळ पावत्या याकामी दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदार यांनी त्यांचे शपथपत्र अनुक्रमे निशाणी ५ खाली दाखल केले आहे. सदर शपथपत्रावरुन अर्जदार यांनी वरील मुद्देमालाचे ते मालक असल्याबाबत कथन केले आहे. त्यावरुन जप्त मुद्दमाल हा अर्जदाराचा असल्याचे दिसुन येते. तसेच इतर कोणीही सदर मुद्देमालाची मागणी केलेली नाही. त्यावरुन अर्जदार हे मुद्देमालाचे मालक असल्याचे प्रथमदर्शनी निष्कर्ष काढण्यात येतात. जप्त मुद्देमाल हा अर्जदार यांचाच मालकीचा असल्याचे शपथपत्रावरुन दिसुन येते. त्यामुळे जप्त केलेला मुद्देमाल पोलीस स्टेशनमध्ये पडून राहणे योग्य होणार नाही.

६. एकंदरीत, वरील विवेचनावरुन जप्त मुद्देमाल म्हणजे दोन गोल टेबल लाल, एक चौकोनी टेबल, दोन बजाज कंपनीचे स्टॅण्डींग फॅन, एक कुलर क्लासीक कंपनीचा, चार जार निळे रंगाचे, नऊ काळ्या रंगाच्या फायबरच्या खुर्च्या व बारा क्रिम रंगाच्या फायबरच्या खुर्च्या या अर्जदार यांच्या असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार हे सदर जप्त मुद्देमालाचा अंतरीम ताबा मिळण्यास पात्र आहे. करीता, सदरचा मुद्देमाल योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदारास अंतरीम ताबा म्हणून देता येईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. जप्त मुद्देमाल दोन गोल टेबल लाल, एक चौकोनी टेबल, दोन बजाज कंपनीचे स्टॅण्डींग फॅन, एक कुलर क्लासीक कंपनीचा, चार जार निळे रंगाचे, नऊ काळ्या रंगाच्या फायबरच्या खुर्च्या व बारा क्रिम रंगाच्या फायबरच्या खुर्च्या अर्जदाराच्या ताब्यात देण्यात याव्यात.

३. तपासी अंमलदार यांनी अर्जदारा कडून ५०,०००/– चे सुरक्षा बंधपत्र लिहुन घ्यावे.

४. तपासी अंमलदार यांनी सदर मुद्देमाल अर्जदार यास परत करते वेळी दोन सक्षम पंचासमक्ष जप्त मुद्देमालाचा सविस्तर व वस्तुनिष्ठ पंचनामा विना कसुर करावा व अर्जदाराच्या खर्चाने सुस्पष्ट मुद्देमाल दिसुन येईल अशी छायाचित्रे काढून ती प्रकरणात दाखल करावीत.

५. अर्जदार यांनी सदर जप्त मुद्देमाल दोन गोल टेबल लाल, एक चौकोनी टेबल, दोन बजाज कंपनीचे स्टॅण्डींग फॅन, एक कुलर क्लासीक कंपनीचा, चार जार निळे रंगाचे, नऊ काळ्या रंगाच्या फायबरच्या खुर्च्या व बारा क्रिम रंगाच्या फायबरच्या खुर्च्या मध्ये कोणताही बदल करु नये की, ज्यामुळे त्याचे मुल्य कमी होईल.

६. अर्जदार यांनी सदर जप्त मुद्देमाल दोन गोल टेबल लाल, एक चौकोनी टेबल, दोन बजाज कंपनीचे स्टॅण्डींग फॅन, एक कुलर क्लासीक कंपनीचा, चार जार निळे रंगाचे, नऊ काळ्या रंगाच्या फायबरच्या खुर्च्या व बारा क्रिम रंगाच्या फायबरच्या खुर्च्या यांचे हस्तांतरण, विक्री, दान इत्यादी व्यवहार करु नयेत तसेच न्यायालय आणि इतर पोलीस अधिकारी ज्यावेळी त्याची मागणी करेल त्यावेळी हजर करावे.

स्थळः– कोरेगाव
दि. २२/०३/२०२४

**(ए. बी. पाटील)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगाव.